SNBP International & Senior Secondary School, Chikhali, Pune.
Affiliation No. 1130703
Academic session 2024-25
NOTES- 9(TERM-2)
Subject - Marathi

std-8th

Prepared by: Renuka Joshi

LESSON- ९.भिकाऱ्यांचा मित्र

- **पूर्व उपक्रम – कोणत्याही पाच लोककथांचे नावे व कथाकारांची माहिती मिळवा.**

**शब्दार्थ.**

१.तांबट आळी - भांडी बनवतात ती जागा

2. तूट - कमतरता

३. न्यायाधीश - न्याय देणारे

४. खजिनदार - खजिन्याचे रक्षण करणारा

**प्रश्न १.पुढील प्रश्नांची उत्तरेएका वाक्यात  लिहा.**

**१. गोष्ट कोण सांगत होते?**

**उत्तर –** गोष्ट हालमोनी आजी सांगत होत्या.

**२. वू कोठे राहत होता?**

**उत्तर** – वू तांबट आळीत राहत होता.

**३. जखमी वू ला घरी येताना काय मिळाले?**

**उत्तर –** जखमी वू ला घरी येताना सात नाणी गुंफलेली एक माळ मिळाली.

**४. खजिनदाराला येताना पाहून वू ने त्याच्या बायकोला कुठे पाठवले?**

**उत्तर** – खजिनदाराला येताना पाहून वू ने त्याच्या बायकोला डोंगरावरच्या बुद्धाच्या मंदिरात पाठवले.

**५. वू ने कोणाचे चित्र रेखाटले?**

**उत्तर –** वू ने गाढवाचे चित्र रेखाटले.

**६. राजाचे पैसे कोण चोरत असे?**

**उत्तर –** राजाचे पैसे खजिनदार चोरत असे.

**प्रश्न २. पुढील प्रश्नांची थोडक्यात उत्तरे लिहा.**

**१. वू लोकांना कशी मदत करत असे?**

**उत्तर –** वू लोकांना कधी गरम- गरम भात तर कोणाला पैसे देत असे.तसेच गरीब वस्त्यांमध्ये,खेड्यांमधून जायचा व गरीब लोकांच्या घराबाहेर पैसे ठेवत असे.

**२. वू ला तुरुंगधिकाऱ्यांनी का मारले?**

**उत्तर –** वू चे पैसे संपल्यामुळे त्याने लोकांकडून कर्ज घेऊन मदत करणे चालू केले.मात्रा त्याला कर्ज फेडता आले नाही तो कर्जबाजारी झाला. त्यामुळे त्याला न्यायालयात उभ केल.

न्यायाधीश व तुरुंग अधिकाऱ्यालाही द्यायला त्याच्याकडे पैसे नसल्याने शिक्षा म्हणून वू ला तुरुंगधिकाऱ्यांनी मारले.

**३. वू ला मिळालेल्या माळेची काय जादू होती?**

**उत्तर –** ३. घरी येताना वू ला सात नाणी गुंफलेली माळ सापडली.त्याने माळेतली पाच नाणी काढली. माळेत पाच नाणी परत आली . चार नाणी काढून बघितली तरीही माळेत सात नाणी शिल्लक राहिली . खूप वेळा नाणी काढली तरी तेवढीच सात नाणी उरत य ही त्या माळेची जादू होती.

**४. खाजीनदाराने काय पहिले?**

४. एके दिवशी पहाटे खजिनदाराला झुंईक–खण, झुंईक खण असा आवाज ऐकू आता राज्याच्या खजिन्यातील अनेक नाणी खोलीच्या छतावरून उडून जात होती . त्यांचा शोध घेतला तेव्हा त्यात दिसले की ती उडून जाणारी नाणी वू च्या छोटयाशा घराच्या छतावर पडत होती.

**५. वू ने काढलेले चित्र पाहून सारे का हसू लागले? त्यावर वू ने काय उत्तर दिले?**

५. वू ने गाढवाचे चित्र रेखाटले . गाढवाचा चेहरा न्यायाधीशाच्या चेहऱ्यासारखा होता. फक्त त्याला एकच कान होता हे पाहून सारेच हसू लागले. एका सेवकाने त्याला एकच कान का काढला? असे विचारले तेव्हा वू ने उत्तर दिले, "हो, ना,तो न्यायाधीशासारखी एकच बाजू ऐकतो.

**पाठनंतरचा उपक्रम – वर्तमानपत्रातील कोणतीही एक गोष्ट चिकटवा किवा लिहा.**

**Subject Teacher** **HOD** **Co-Ordinator** **Principal**